MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Oct. To Dec., 2021
Special Issue

01



EDUCATION THROUGH SELF HELP IS OUR MOTTO



## रयत शिक्षण संस्थेचे,
## एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर, पुणे–२८.
नॅक–ए ग्रेड, संलग्न सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

रयत शिक्षण संस्थेचे,
एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे–२८.
मराठी विभाग आयोजित
आंतरराष्ट्रीय वेबिनार

# विषय:मराठीतील १९६०नंतरचे विविध वाङ्मयीन प्रवाह व सद्य:स्थिती

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता™

प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे

**प्रमुख संपादक**
प्रा.डॉ.राजेंद्र ठाकरे
प्रा.डॉ.अतुल चौरे

**सहाय्यक संपादक**
प्रा.डॉ.नम्रता मेस्त्री
प्रा.डॉ.संदीप वाकडे

शनिवार दि.११ सप्टेंबर २०२१

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Govt. College of Arts & Science
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science Aurangabad

Date of Publication
01 October 2021

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता® .कॉम

You Tube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles, Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT FACTOR 7.940 iijif

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

http://www.printingarea.blogspot.com



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

52) आ.य.पवारांच्या कवितेतून येणारा निसर्ग
प्रा.डॉ.पोळ रमेश पांडुरंग, कराड ||264

53) ग्रामीण साहित्याचे स्वरूप, वाटचाल आणि सद्य:स्थिती
शिंदे सदाशिव & डॉ. राजेंद्र ठाकरे ||268

54) आदिवासी साहित्याची प्रेरणा व स्वरूप
डॉ. संजय शिंदे, राजगुरुनगर ||271

55) आदिवासी प्रवाह व कथात्म साहित्यातील स्त्रीजीवन संघर्ष : एक अभ्यास
डॉ. वर्षा मोहनराव बिलोलीकर, नांदेड ||277

57) १९६० नंतरची ग्रामीण कविता आणि सद्यस्थिती
डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे, ता.जि. धुळे ||283

58) १९६० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेच्या मर्यादा
प्रा.डॉ.कैलास सलादे, जि. नासिक ||287

59) जागतिकीकरण आणि आदिवासी कविता
जयश्री भदर्गे ||293

60) मराठी मुस्लिम कथा साहित्य
डॉ. भारती मच्छिंद्र काळे, जिल्हा— अहमदनगर ||296

61) कवी अरूण काळे यांची 'नंतर आलेले लोक' मधील कविता आणि जागतिकीकरण
डॉ. एकनाथ फुटाणे, औरंगाबाद ||299

62) दलित नाटक
डॉ. सुनिल काशिनाथ खामगळ, बारामती ||306

63) दलित साहित्य निर्मितीचे केंद्र, मराठवाडा
प्रा. अशोक खेत्री, जि. बीड ||309

64) मारूती चितमपल्लीचा निसर्गमयी वाङ्मयीन आविष्कार
डॉ. प्रज्ञा राजेश निनावे, नागपूर ||312

65) साठोत्तरी ग्रामीण कादंबरीचे स्वरुप
डॉ. योगिता मारुती रांधवणे, जि. अहमदनगर ||319

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

Govt. College of Arts & Science Aurangabad



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

61

# कवी अरूण काळे यांची 'नंतर आलेले लोक' मधील कविता आणि जागतिकीकरण

डॉ. एकनाथ फुटाणे
मराठी विभागप्रमुख, मशिसे—गट अ,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

***********

जागतिकीकरणाच्या रेटयांत काही गोष्टी चांगल्या घडत गेल्या, तर काही गोर्ष्टीचे प्रतिकूल परिणाम समाजावर झाले. साहित्याच्या संदर्भात विचार केला तर सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळी मंदावल्या आहेत, असे म्हटले तर वावगे ठरू नये. दलित आणि ग्रामीण साहित्याच्या चळवळीही ओसल्यासारखा झाल्या आहेत. दलित साहित्य किंबहुना कवितेत एक प्रकारचे साचलेपण आले आहे. अशा स्थितीत एखादा कवी काळाच्या सर्वांगीण कक्षा कवेत घेऊन कविता करीत असेल तर त्याच्या कवितावर विचारविमर्श झाला पाहिजे अशा कवींमध्ये अरूण काळे यांचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागेल. 'सामान्य माणसाचे जगणे' हे त्यांच्या कवितेचे आशयसूत्र आहे.

जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणमुळे सामान्य माणसांसमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. शहरांचा विकास होत आहे. उदयोग वाढत आहेत त्याचबरोबर खेडी उदास आणि भकास होत आहेत. बेकारी, दारिद्रय, राजकीय भ्रष्टाचार, धार्मिक असहिष्णुता, विविध क्षेत्रातील स्पर्धा, आणि माणसाची वरचेवर वाढत चाललेली आत्मकेंद्री वृत्ती या सर्व समस्येंवर आज तरी ठोस अशी उपाययोजना ना शासनाकडे आहे ना समाजाव्यवस्थेकडे आहे. अशा स्थितीत लेखक, कवी हे ही समाजाचे अत्यंत महत्वपूर्ण घटक आहेत त्यांनी काय लिहावे हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. काळाची पावलं ओळखून कवी अरूण काळे यांनी आपली कविता सक्षमणपणे लिहीली आहे. त्यांचे रॉकगार्डन (१९९३), सायरने शहर (१९९७), आणि नंतर आलेले लोक (२००६) हे कविता संग्रह प्रकाशित झाले आहे. अरूण काळे यांची कविता उत्तरोत्तर अधिक परिपक्व आणि सक्षम होत गेलेली आहे. तद्नुषंगाने रॉकगार्डन (१९९३), आणि सायरनचे शहर (१९९७) या कवितासंग्रहापेक्षा नंतर आलेले लोक (२०१६) मधील कविता आधिक व्यापक आशय व्यक्त करताना दिसते. त्यांनी कवितेचा विषय, प्रयोजन याची स्पष्टता आपल्या काही कवितांमधून सांगितली आहे.

कवितेचा विषय काय असावा? कविता कुणावर लिहावी? कवितेचे प्रयोजन काय असावे? या संदर्भात अनेक उपहासात्मक प्रश्न कवी अरूण काळे उपस्थित करतात. 'बारकोडींगवाल्या मुली' या कवितेमध्ये म्हणतात. ज्या मुली आसाम, बंगाल उत्तरांचल किंवा बिहारमधून अथवा आणखी कुठूनतरी बाहेरून आलेल्या आहेत. त्यांच्या अवयवांची नैसर्गिकरित्या वाढ झाली नाही येथील महाशयांनी ते ओढून ताणून मोठे केलेत, तुमच्या महानगरात आणून सोडून दिलेले आहे त्यांना अशा मुलींवर कविता लिहा.

ढकलीत ढकलीत तुमच्या महानगराच्या,
एका कोप—यातील जगात आणून सोडलयं,
आणि परतीचे दारे कापून काढलेत.

या मुलींचे परिस्थितीने, समाजव्यवस्थेने परतीचे दोर कापल्यामुळे त्या मुली परत आपल्या मुळ ठिकाणी



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

जाऊ शकत नाहीत आणि मग कवी म्हणतात—
बजारात बसून मुलींच्या झाल्या रोगट म्हताऱ्या,
इंद्रधनुषी अंधार आणि विजांच्या, लखलखाटात,
मेघगर्जनांसारख्या.

उदरनिर्वाहासाठी शरीर विक्रयासाठी, नाचगांण पुन्हा पुन्हा डाव खेळावा लागण रात्रभर नाचल तरी जेवण न मिळणं. कधी कधी अशा मुलींची बोव्हनीदेखील होत नाही. कवी अरूण काळे म्हणतात, हे सर्व राजे आणि देवादिकांपासून चालत आलेल आहे. मग ज्यांनी हे सर्व केलं त्यांना कोणते रोग झाले हे पण कवितेत लिहिले पाहिजे. आमच्या संस्कृतीने ज्यांच्यावर 'सेक्सवर्कर' म्हणून शिक्का बसवला आहे त्याच असं नागड उदात्तीकरण केल आहे. त्यासाठी अशी एखादी इंडस्ट्री आहे का? ज्यांचे कामाचे तास निश्चित केलेले आहेत.

लिहा ना या मुलींवर एखादी कविता
ज्यांच सेक्सवर्कर म्हणून उदात्तीकरण केलंय.

दारूडा बाप, टी.बी. झालेली आई अशांसाठी चालू द्या ना तुमची लेखणी जे गरीब. दुर्बळ बिचारे मनीऑर्डरची वाट पहात बसलेले आहेत जंगलात, पहाडात दूर गावाकडे, ज्या स्वत:च्या लग्नासाठी दहेज गोळा करण्यासाठी आल्या आहेत, दोन—तीन वर्षे शरीर विकून गावी जाऊन लग्न करणार आहेत, संसार थाटणार आहेत, अशा मुलींवर कविता करून त्यांची दु:ख, वेदना कवींना आपल्या काव्यातून मांडता नाहीत का येणार? असे अनेक प्रश्न कवी उपस्थित करतात. बारबालांसाठी वारयोषिता, वारांगणा असे प्रमाणभाषेतील गलेलठ्ठ शब्द वापरलेत तर त्यांच्यासाठी तुमची झिजू द्याना लेखणी. कवीला हे संदर्भ देताना महात्मा राजा रावणाची बहीण शुर्पणखेची आठवण येते.

जसं एका सभ्य राक्षस राजाच्या बहिणीचं,
कापल गेल नाक, थान अन तरीही तो
वागला सुसंस्कृतपणे अशोकवनात,
हे तुम्ही सोयीस्करपणे विसरता?

आजही ज्या मुली नवस बोलतात ज्यांचे डोळेच उघडलेले नसतात किंवा डॉलीला ओढ गोतमाऊलीची, शीखाला नांदेडची, चंदाला अंबाबाईची, सलमाला अजमेरच, नीलमची शिर्डीची वारी ही बहुसंख्य देवसंख्या, पण माणूस पूर्वीपासून अल्पसंख्यच आहे. कवी म्हणतात—

आता तर देवसंख्येचा स्फोटच झालाय, लिहिता का यावर एक कविता?
मी तर लिहिणार आहे, परत म्हणू नका की आंम्हाला विषयच माहीत नव्हता.

जागतिकीरणाने माणूस सर्वांगीण ढवळून निघाला. जागतिकीकरणाचा परिणाम हा माणसाच्या सामाजिक, सांस्कशतिक, आर्थिक परिस्थितीवर झाला. उपक्षित समाज, त्यांचे द्रारिद्रय, अज्ञान, दु:ख, व्यथा, वेदना यांचा वावर कवितेत प्रामुख्याने असला पाहिजे. व्यवस्थेतील घोटाळे, शोषक आणि शोषित यांची चाललेली अखंड परंपरा हयाचा परत एकदा हिशेब मांडावाच लागतो तो कवितेतून मांडला पाहिजे त्यासाठी 'प्रयोजन' मध्ये कवी म्हणतात—

कुणी अक्षर सुधारण्यासाठी कविता लिहित नसतो.
नरकाच्या भीतीपोटी कवितेवर अविश्वास दाखवू नये,
स्वर्गाच्या क्षेत्रफळाशी देण—घेण ठेवू नये.

कवितेवर नितांत श्रध्दा असणारा हा कवी निर्भीडपणे आपली लेखणी चालवतो. त्याला स्वर्गाच्या क्षेत्रफळाशी काही देण—घेणं नाही. जीवनातील मानवी मूल्यांची पडझड आणि खाउजाचे परिणाम याची मांडणी कवितेतून तो करतो.

आज खाउजाने प्रत्येक क्षेत्रात धुडगुस घातला



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात संगणकाचे इतके महत्व वाढले आहे की, मानवाचे अवमूल्यन झाले आहे. कवी अरूण काळे 'माहितीचे माहितीगार' या कवितेत माहितीच्या लेखाजोख्याचा पडदाफाश करताना लिहितात,

माहितीच्या स्फोटात, उडतात जाहिरनामे,
माहितीच्या बैलांना, माणूस नाही माहीत,
आज किती अर्धपोटी झोपलेत,
आज किती जागे आहेत पोट धरून,
चालू आर्थिक वर्षात कितीजणांची झाली अवहेलना?
वर्ग– वर्चस्वाने.

भारतीय समाजवार मुक्त अर्थव्यवस्थेचे झालेले दूरगामी परिणाम, त्यातून सामान्य माणूस अधिकच भरडला गेला. त्याच्या स्वत्वावरही व्यवस्थेने घाला घातला. छोटे–छोटे गरीबांचे उद्योग नाहीसे झाले.

गरीब गरीबच राहिला त्याचा दारिद्रय अधिकच वाढलं, सामाजिक विषमता वाढली सर्वसामान्यांच्या घरांचे प्रश्न, त्यांना अठ्ठेचाळीस तासांची नोटीस दिल्यावर त्यांची अवस्था काय होत असेल याची फक्त कल्पनाच केलेली बरी

'ई–राख, आग, वाळू, माती ई–रॉक किंवा काहीही या कवितेत कवी म्हणतात –

मुक्त व्यवस्थेचा सांड घुसला, स्ट्रीट गायीच्या कळपात,
निर्गुंतवणूकीत बांधले बांधाबांधावर, उड्डाणपूल उडत्या गाढवांनी.

'खिडकी उर्फ विण्डो' २००७, 'आम्ही बाराला फाटयावर मारतो? या कवितांमधून सामान्य माणसाच्या जगण्याची अगतिकता कवी चित्रीत करतात. एक खिडकी योजनासारख्या योजना निघाल्या पण त्या कुणासाठी आहेत कितीतरी लोक रस्त्यावर उघडयावर झोपतात. दार–खिडक्यांशी ज्यांचा तिळमात्र संबंध नाही त्यांनी या शासनाच्या योजनांचा काय उपयोग झाला? बारबोडयांनी उघडलेले संकेतस्थळ, कॉन्ट्रॅक्ट कुणाला मिळतात? वस्तुंचे भाव बारानंतर वाढतात. अशा कितीतरी प्रश्नांची अरूण काळे यांची कविता वेध घेते. वाचन, लेखन यावर देखील समाज माध्यमांचा परिणाम जाणवत आहे. व्हॉट्सअॅप, हाइक, फेसबुक, व्टिटर यासारख्या सोशल मिडीयाने समाज ढवळून निघाला आहे. अरूण काळे म्हणतात. जगाच ग्लोबल गाव केल आहे तर मग प्रेमाचे होऊ दया ना जागतिकीकरण. कवी म्हणतात –

नातेवाईकांनी फोन आणि क्रेडीट कार्डची चौकशी केली,
प्रत्यक्ष भेटण्यासाठी दोघांनी घेतला घटस्फोट इंटरनेटवर,
टर्मिनेटसारखी प्रजनन–क्षमता नसलेली, माणसं बाजारात आली,
कृत्रिम पावसाच्या कवितांना, राज्य पुरस्कार मिळाला.

प्रस्तुत कवितेत पुढे कवितांचे रिमिक्स. डिजिटल कवितासंग्रह, पाच जणांचे पॉली समीक्षा केंद्र, भीतींची जनुकं, सायबर कॅफे, इनायत कॅफे अशा आश्यपूर्ण संज्ञा वापरून जागतिकीकरणाने आम्हाला किती व्यापून टाकलं आहे. हे सूचित करतात. उदारीकरणाच्या लाटा, पुरूषांच्या अॅडिशनल खाटा, आरोग्यांच्या सभा, रोगांची शिबिर, सती जाण्यायोग्य विद्युतदाहिनी, इ. शब्दांच्या चपखलपणे वापर करून खाउजाचा प्रभाव व्यक्त करतात.

सोवळ्याने वाढलं रिमोटव्दारे पाणी,
शेतकरी कवीसारखी करू लागले आत्महत्या,
चायना बाजारात आलं भारतीय संगीत,
'बहोत सही आवाज़ है' नाक्यावर आल्या प्रतिक्रिया.

छोटया–छोटया कार्यक्रमामध्ये विश्वसुंदरी सारख्या मुलींना आनंदाश्रू येऊ लागले. बक्षीस मिळाल्यावर भटक्यांना स्केटींग, आदिवासींना आर्टिफिशल



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

जंगल, दलितांना मटन वेफर्स. व्यापार त्यातून विषमता निर्माण झाली. एका माणसांचा एक, दोघांचे दोन, शंभराचे शंभर, मग नाती अनायासे चोर बाजारात, विचारवंत गुराखी अशी ही अवस्था झाली आणि यामध्ये माणसांचे अवमूल्यन झाले.

डांबरीकरणासारखा उखडला पुन्हा पुन्हा, रस्त्यातला माणूस,

प्रेमाला डांबलय देवळात, व्देषाला एक्चेंज ऑफर व्देषाचीच,

प्रेमाच्या भरून येत नाहीत ट्रक्स, ट्रेन विमानं आणि जहाजं,

जगाचा ग्लोबल गावं केलयं ना तर प्रेमाच होऊ द्या ना बाबा जागतिकीकरण.

'नंतर आलेले लोक' ही अरूण काळे यांची कविता या देशातील संस्कृतीचा इतिहास मांडते. नंतर आलेल्या लोकांनी मूळच्य येथील लोकांची कशी फसवणूक केली, अन्याय केला, गुलाम बनविले, विषमता निर्माण केली येथील लोकांना कसे न्यूनत्व दिले याचा वेध ही कविता घेते नंतर आलेल्या लोकांना सुरूवातीला बायका—मुलं, दार, प्रांत, मातृभूमी असं काहीही नव्हतं त्यांनी हे सर्व नंतर बळकावलं.

प्रारंभी गुराखी असणारे, चाचेगिरी, फसवेगिरी, व्यापार करणारे हे लोक येथील नंतर राजे आणि पुरोहित झाले, मालक झाले या लोकांनी खंड, देश, तारे, ग्रह हया सर्वांचा शोध घेतला, पण माणसांतल माणूसपण नाही रूजवल किंबहूना शोधल नाही.

माणूस शोधला नाही

नंतर आलेल्या लोकांनी

नंतर आलेले लोक खोटारडे, ढोंगी होते. त्यांनी वंशभेद, रंगभेद, वर्गभेद, वर्णभेद केला. कट कारस्थाने केली. संपत्तीची खोटी कागदपत्रे तयार केली. गुलाम आणि स्वर्ग निर्माण केला. देव, नर्क निर्माण केला. बाप—मुलगी, भाऊ—वाद, सीमा—बांध निर्माण केले. जंगलाचा विध्वंस केला. नद्या डोंगर देखील बाजारात आणले. कवी म्हणतात. —

नंतर आलेले लोक मतलबी आणि कपटी होते,

त्यांनी झाडं जाळली, प्राणी जाळले,

माणसं जाळली, घरंदार जाळली,

कलह आणि युध्दे पुकारली,

स्वातंत्र्याचे पुतळे उभारले,

दुसऱ्याच्या देशावर आपले राष्ट्रगीत लिहिले,

त्याहुनही मूळच्या लोकांना,

हद्‌पार केले, नंतर आलेल्या लोकांनी.

'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा', 'उदारीकरणाची सायबर खिंड', 'खरं बोललं की सख्या आईला राग येतो', 'सीताराम मास्तरंच अगतिकीकरण' आदि कवितांमधून वास्तव विदारक मूल्यांचे पतन याचा समाचार घेतला आहे. त्याचबरोबर शुद्रांना आजही कसे रस्त्यावर ठेवले आहे यांची खंत कवी व्यक्त करतात. आयटीच्या युगाचे दलितांवर भयंकर परिणाम झाले.

आता या आयटीच्या युगात, दलितांना डि—लिट करण्यासाठी

नवनवीन सॉफटवेअर येताहेत, आणि प्रोग्रॅम खराब करण्यासाठी सोडले जाताहेत विषाणू.

आज एकविसाव्या शतकात अनेक बदल झाले, प्रचंड वेगानं जग बदलत आहे. पण माणसाची गणित उफारटयारितीने आजही सोडविली जात आहेत. माणसालाचा वस्तू बनविले जात आहे. स्वत:च्या फायदयासाठी इतरांनानष्ट करणारे आणि लोकशाहीचा खोटा आव आणणाऱ्यांना कवी धारेवर धरतात.

हे दु:खी लोक अन् हया जाहिराती,



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

हे चौकाचौकातीलले मड आयल्र्स,
हे एक्सचेंज मेळावे अन् ढुंगण घोळावे,
हे रेडियल टायर्सवर बसून येणारे,
कोट टायवाले सैनिक, हे बाटलीक पेयांचे शीतयुद्ध,
हे महोत्सव कॉन्टिनेंटल फूड्सचे.

अरूण काळे यांनी वर्तमान काळात घडत असलेली वैश्विक बदल कवितेत मांडला आहे. साधारणत: १९९० नंतर जागतिकीकरणाची प्रक्रिया अधिक वेगवान झाली. जगभरात विविध साहित्यप्रकारातून जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेवर लिहिले जाऊ लागले. जागतिकीकरणामुळे समाजावर जे भले—बुरे परिणाम झाले; या परिणामाचा वेध 'नंतर आलेले लोक' या काव्यसंग्रहातून अरूण काळे यांनी घेतला आहे. त्यांच्या बऱ्याच कवितांमधून ते तत्कालिन परिस्थितीतील समाजव्यवस्थेला विधानात्मक स्वरूपात प्रश्न विचारतात,

बगले — बगलेतून वाहणारे डिओड्रंचे वारे,
वियाग्राच्या पुलावरून उडया मारणारे हे दमलेले घोडे,
ब्रेकमध्ये घेतला पिझ्झा, अन मलाई कोफ्ता,
हे सनातन मोड्स ऑपरेंडी, हा कॉमन मिनिमम प्रोग्रॅम,
हे महाजाल एक इंद्रजाल, ही ॲब्जर्डिटी ही ॲसिडिटी,
पाच इंद्रियाचं असतं इनकमिंग, आऊटगोईंग,
मरणाचा रियाझ रोज करणाऱ्यांना,
काय वाटत शेवटी मरताना.

खाऊजा संस्कृतीचा नेमका धागा कवींने पकडून, वैश्विक सत्य मांडले आहे. एकीकडे प्रचंड श्रीमंती तर दुसरीकडे मरणाच्या घटका मोजणाऱ्या दरिद्री 'माणूस' त्यांच्या कवितेचा विषय होतो. प्रचंड विषमता, गरिबी, दारिद्रय, शोषण जातीभेद यांने हा सारा समाज ग्रासून गेल्यामुळे त्यांचे वास्तव अरूण काळे आपल्या कवितांमधून चित्रीत करतात. आज महानगरात 'माणूस' होरपळला आहे, जीवघेना संघर्ष, बेकारी, दारिद्रय, स्वार्थी, ढोंगी, सत्तापिपासू राजकारणी, त्यांच्या भूलथापा यांमुळे वांज आशेवर माणूस जीवन काढत राहतो. महानगरीय जीवन हे अशांत, अतश्प्त रखरखीचे कसे आहे याचे वर्णन कवी करतो.

'नंतर आलेले लोक' या काव्यसंग्रहातील 'मल्टीलुटालुटीचा झिंग लपालपा' शेवटची उपहास व उपरोधीक शैलीत लिहिलेली कविता, जागतिकीकरणामुळे मानवी मूल्ये कशी पायदळी तुडवली आहेत, याचे चित्रण करते. येथील भांडवलशाही म्हणजे ज्या आज देशात बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत त्यातून अमानूषपणे होणारे शोषण कवी हिंसा करणाऱ्या पशूच्या प्रतिकांमधून व्यक्त करतात.

''श्वापदाने मारली शिकार, तोंड खुपसून मारली डकार,
टुकटुक पाहणाऱ्यांनो कोल्हे—लांडगे, गिधाडांनो,
तुटून पडा लुटालुटा, दात विचका पुढे घुसा,
हाव आहेच, ताव मारा, पोटं तुडुंब भरली आता,
जाणाराची जान गेली, खेद नको खंत नको,
तो नालायक गेला म्हणा, नाचा अन् आनंद करा,
खुल्क है खुदाका आणि मुल्क जनताका,
हुकूम कंपनीका, नाचो झिंगझिंग लपालपा,
घुंब घुंब नका नका, झिंगझिंग लपालपा.''

'मानवता' वेशीवर टांगलेली ही आजची बहुराष्ट्रीय कंपन्यामधील मानवी प्रवृत्ती कितीही शोषण केले तरी त्यांची भूक भागत नाही. ही भूक म्हणजे कोल्हे, लांडगे, गिधाडांसारखी हावरट वाणाची आहे. दुसऱ्याचे रक्त शोषण करून आपल्या तुंबडया भरणारी आहे; इतरांशी काही देणे — घेणे नाही. दुसऱ्याचा अमानुषमणे बळी गेला त्याचा यत्किंचितही खेद न माणनारी ही अमानवी वृत्ती आहे. प्रस्तुत कवीतेत एका वेगळया पद्धतीने शोषण करणाऱ्या वर्गाचा अनुभव व्यक्त करतात. 'हुकूम कंपनीका' हा नवीन शब्दप्रयोग



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

कवी योजतात, त्यातून एक वेगळा आशय व्यक्त होऊन, नवकवितेचे संदर्भ बदलात, वाचकाला सदरील कविता एक वेगळा अनुभव देते. स्वार्थी व ढोंगी लोकांच्या हातात हे माहिति तंत्रज्ञानाच कोलीत सापडल्यामुळे माणूस पुन्हा येथे नागवलाच जातोय, असे परखड विचार मांडतात.

स्वत:च्या स्वातंत्र्यासाठी दुसऱ्याचं स्वातंत्र्य नाहीसे करणारे साले हे लोकशाही जननीवाले दुलंगे आपलं त्यांच्यावर फार प्रेम पण आपल्या कल्याणाचं राज्य, निघालेत ते मोडीत काढायला अन् हे माहिति तंत्रज्ञानाच कोलीत, सापडलंय माकडांच्या हातात असा विद्रोह त्यांच्या कवितेतून येतो.

जागतिकीकरणाच्या युगात माणूस आणि संगणक हा संघर्ष होत आहे. त्यात माणसाचे अवमूल्यन होत आहे. या संदर्भात डॉ. कमलाकर पायस म्हणतात, 'संगणक ही भांडवलशाहीचे प्रतीक आहे. नफा मिळविणे हेच उद्दिष्ट घेऊन भांडवलशाही जगत असते. ही संस्कश्ती, समता, स्वातंत्र्य आणि बंधूतेला मारक आहे'. अर्थात् माणसाला एकदा रोबोट केलं की माणसाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होईल. माणसाचा यंत्र म्हणून वापर होऊ लागला तर तो संगणकापुढे टिकणार नाही. त्यातूनच संवेदनाहीन समाज निर्माण होण्याची भिती कवीला वाटते. सामान्य माणसाचं वास्तव जीवन चित्रीत करतांना कवी अरूण काळे म्हणतात—

सुक्काळीच्या कर्जात नियमित दुष्काळ,
मरतो शेतकऱ्याचा ट्रक्टर,
मध्यमवर्ग एक तरूण अंधारात भवितव्याला,
माहितीवाले गेले हरखून,
देवीच्या रोग्यावानी नष्ट होतोय कारकून.

शेतकऱ्याचे प्रश्न मध्यमवर्गीय तरूणाचे प्रश्न, त्याच अंधारमय भविष्य, माणसाला मिळणाऱ्या एक्सचेंज ऑफर, पुरोगामी दुकानातील क्रेडीट कार्ड, अशा प्रतीकांचा वापर करून अरूण काळे आपल्या कवितेचे आशयसूत्र अधिकच सक्षम करतात ते म्हणतात मी कुणी समालोचक नाही तर मी दूरदृष्टी ठेवून नात्याची नव्याने मांडणी करणारा आहे.

मी लांब पल्याची विजयी सूत्र मांडणारा,
मी नात्यांची नव्याने मांडामांड करतो,
माणूस भंगारात येऊ नये म्हणतो,
कवितेतून पून्हा पून्हा उगवत राहतो.

आज माहिति तंत्रज्ञानाच्या युगाचे मोठया चवीने गोडवे गायले जातात, पण यामुळे सामान्य माणूस कसा नागवला गेला आहे? सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्व स्तरांवर सामान्यांचे शोषण झाले आहे. आज कलावंत कसा देशोधडीला लागला आहे याचे चित्रण कवी 'सिताराम मास्तरांच अगतिकीकरण' या कवितेत करतो. —

लग्नाचा फुल सिझन गेला, फक्त दोन सुपाऱ्या मिळाल्या,
कुत्र्या—मांजरासारख्या हाडफिरवाल्या,
बेन्जो/बाज्यापुढं आपलं काय चालंना,
म्हणे स्पर्धेच युग आहे, याला म्हणता काय रे खुली स्पर्धा?
काय असतं रे तुझ ते जागतिकीकरण—खाजगीकरण?

थोडक्यात अरूण काळे यांची कविता शोषितांच्या दु:खाची वाट मोकळी करते. प्रस्थापिताचा कावेबाजणा, फसवेगिरी यांचाही हिशेब मांडते. नंतर आलेले लोकमधील कविता मानवतावादाचे समर्थन करते. तेवढी व्यापकता तिला सहजणे लाभलेली आहे. नंतर आलेले लोक या काव्यसंग्रहाच्या संदर्भाने काही निरीक्षणे नोंदविता येतील.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

• जागतिकीकरणामुळे सर्वसामान्य माणसाचे प्रश्न सुटलेले नाहीत तर ते अधिकच जटिल होऊ पाहत आहेत.

• जागतिकीकरणाच्या प्रकियेत माणूस आत्मकेंद्री होत आहे. तसेच त्याच्या संवेदना अधिकच बोथट झाल्या आहेत.

• जागतिकीकरणात सर्वसामान्य माणूस कसा होरपळून निघाला आहे याचे चित्रण 'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहातून येते.

• माहितीच्या प्रस्फोटामुळे सामान्यांच्या जगण्याचे संदर्भच बदलून टाकले.

• जागतिकीकरणात स्त्रियांना पूर्वीपासून असलेल दुयमत्व, शोषण त्यांचे झालेले वस्तुकरण यात फारसा बदल झालेला नाही.

• संगणक आणि माणूस यांच्यात कदाचित युध्द होईल आणि ज्या माणसाने संगणक बनविला त्याचाच पराभव होईल की काय? भविष्यात माणसाचे अस्तित्व नाहीसे होईल की काय? असे कवीला वाटते.

• कवीने जो समाज उपेक्षित आहे, समाजात ज्यांना आजही अस्तित्व नाही, ज्यांना स्वीकारलेले नाही अशा विषयांवर कविता लिहावी अशी सूचना केली आहे.

• जागतिकीकरणाचा व्यापक संदर्भ म्हणून अरूण काळे यांच्या कवितेतून व्यक्तिचित्रे येतात ती स्वतंत्रपणे येत नसली तरी लक्षवेधक निश्चितच आहेत.

• अरूण काळे यांच्या कवितेतील विद्रोह हा संयत आहेत, तो जागतिकीकरणातील नफेखोर भांडवलशाही, चंगळवाद, शोषणव्यवस्थेच्या विरूद्ध आहे.

• ही कविता गौतम बुद्ध, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तात्विक व वैचारिक अधिष्ठानातून आविष्कृत झाली आहे.

• प्रस्तुत काव्यसंग्रहातून अरूण काळे यांनी संगणक, मदरबोर्ड, मॉनिटर, कि—बोर्ड, प्रोगॅम, मेमरी, डिलिट, डाटा, वेबसाईट, माऊस, चॅटिंग, विषाणू, ईमेल या शब्द प्रतिमांमधून जागतिकीकरणांच्या परिणामांचा अचूक वेध घेतला आहे.

**समारोप —**

जागतिकीकरणाची नवी व्यवस्था आणि मानवी मूल्याची व्यवस्था या संदर्भात आज अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. बदलत्या अर्थ आणि समाजव्यवस्थेचा परिणाम वाङ्मयीन चळवळी, सामाजिक चळवळी यावरीही झाला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात भांडवलशाहीने धुडगूस घातला आहे. संपूर्ण जग एक खेडे झाले आहे. या संदर्भात उत्तम कांबळे लिहितात, 'जागतिकीरण म्हणजे आपला घास ओढून घेणारी यंत्रणा असा गरीबांचा समज झाला असे असले तरी त्याचे परिणाम प्रत्यक्ष अप्रत्यक्ष गरीबांवर झालेले आहेतच हे नाकारता येणार नाही. एकूणच जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल समाजवास्तव अरूण काळे याच्या 'नंतर आलेले लोक' या कवितेतून येते. शेवटी रवीन्द्र किंबहुने लिहितात. 'समकालीन मराठी' कवितेची सगळी समीक्षक—सुलभ वर्गीकरण ओलांडून 'नंतर आलेले लोक' या संग्रहातील अरूण काळे यांनी समकालीन बोलीला आपलेसे करून आपल्या कवितेचे आशसूत्र अधिक प्रभावीपणे मांडले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:—**

१. काळे अरूण 'नंतर आलेले लोक', लोकवाड्.मय गृह, प्रभादेवी, मुंबई, सहावी आवृत्ती, मे २०१५.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

२. कांबळे उत्तम (संपा) जागतिकीकरणात मराठी कविता, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई — २००९.

३. चांदवडकर तुषार, गोखले चारूता (संपा) नवोदत्तरी मराठी साहित्य आणि समाज, कुसुमाग्रज प्रकाशन, पहिली आवृत्ती — २०१६.

४. पाटणकर वसंत, जागतिकीकरण आणि मराठी कविता, कविता — रती, दिवाळी अंक — २०१४.

५. नेमाडे भालचंद्र, साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण, पाचवी आवृत्ती — ऑगस्ट २००६.

६. इंगळे अशोक, नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती २० मार्च २०१८.

७. कांबळे उत्तम, जागतिकीकरणाची अरिष्टे, कॉ. गोविंद पानसरे, अमृत महोत्सव समिती, दुसरी आवृत्ती २०१०.

८. शास्त्री जयश्री (संपा), समकालीन मराठी साहित्य: चिंतन आणि चिकित्सा, Scholarly Research Journal For Interdisclplinary Studies April – June 2021, vol – 10. Issue – 55.

❑❑❑

62

# दलित नाटक

**डॉ. सुनिल काशिनाथ खामगळ**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय (कला, विज्ञान व वाणिज्य), बारामती

**********

स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्यामध्ये विविध वाङ्मय प्रवाह उदयास आले त्यामध्ये प्रामुख्याने दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, विज्ञान साहित्य, आदिवासी साहित्य या प्रवाहाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. या सर्व साहित्य प्रवाहाने मराठी साहित्यात मौलिक भर घातली आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र इत्यादी साहित्य प्रकारांमध्ये शिक्षणामुळे आत्मभान आलेल्या अनेक नवलेखकांनी लेखन केले. मराठी साहित्यात विविध स्तरावरील अनुभव प्रकट झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने दलित साहित्याची निर्मिती झाली. शिक्षणाशिवाय जाणिवा प्रगल्भ होणार नाही याची जाणीव त्यांना होती. त्यांनी दलित समाजाला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र दिला. हजारो वर्ष अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेला समाज जागृत झाला. वर्णव्यवस्थेच्या विरुद्ध बंड करुन उठला. आम्ही सुद्धा माणूस आहोत, माणूस म्हणून जगण्याचा अधिकार पाहिजे या विचाराने प्रेरित होवून न्यायहक्कासाठी लढू लागला. परंपरेला नकार देऊन विज्ञाननिष्ठा अंगीकारू लागला. हजारो वर्ष जे जीवन जगले, भोगले, अनुभवले ते मांडू लागला



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad